Jagdamba Education Society's
# Santosh N. Darade Polytechnic
At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401
Accredited by
NATIONAL BOARD OF ACCREDITATION

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing… **Date: 08/10/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

आपल्या वाचाण्या, आपल्या वाचाण्या...
आपलं महानगर My महानगर.com
www.mymahanagar.com

# दिनविशेष



## लेखक, संपादक शंकरराव किर्लोस्कर

शंकरराव वासुदेव किर्लोस्कर हे मराठी संपादक, लेखक व व्यंगचित्रकार होते. ते किर्लोस्कर मासिकाचे संस्थापक-संपादक होते. त्यांचा जन्म ८ ऑक्टोबर १८९१ रोजी सोलापूर येथे झाला. त्यांचे वडील वासुदेव किर्लोस्कर सोलापुरातील पहिले पदवीधर डॉक्टर होते. चित्रकलेच्या आवडीमुळे त्यांनी लाहोरमध्ये रीतसर चित्रकला शिकायला सुरुवात केली व कालांतराने त्यांना मुंबईच्या सर जे.जे. कला विद्यालयात वरच्या वर्गात प्रवेशही मिळाला. शिक्षणानंतर ते किर्लोस्करवाडीला आले. तेथे त्यांचे चुलते लक्ष्मणराव किर्लोस्कर यांनी स्थापलेल्या किर्लोस्कर कारखान्यात जाहिरातींची सूत्रे ते सांभाळू लागले. आपल्या कारखान्याच्या उत्पादनांची जाहिरात करण्याच्या हेतूने १९२० साली त्यांनी 'किर्लोस्कर खबर' नावाने वृत्तपत्रिका सुरू केली.

१९२९ साली वि. दा.सावरकरांच्या सूचनेवरून किर्लोस्कर खबर हे नाव बदलून या नियतकालिकाचे नाव 'किर्लोस्कर' असे ठेवण्यात आले. पुढे किर्लोस्कर मासिकाच्या 'स्त्री', 'मनोहर' या भावंडांचाही जन्म झाला. या मासिकांच्या निमित्ताने किर्लोस्करांच्या हातून फार मोठी साहित्यसेवा झाली. साहित्याबरोबर औद्योगिक क्षेत्रावरही त्यांनी आपला ठसा उमटवला. किर्लोस्कर समूहात विक्री आणि कार्यालयीन व्यवस्थापक आणि प्रचारक म्हणून ते कार्यरत होते. शंकरराव किर्लोस्कर यांनी 'आत्मप्रभाव', 'टाकांच्या फेकी', 'यशस्वी धंद्याचा मार्ग', 'यांत्रिकाची यात्रा', 'व्यापाराचे व्याकरण', 'शंवाकिनी' (आत्मचरित्र) इत्यादी पुस्तके लिहिली. 'डेक्कन मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन'ची स्थापना, 'मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज'चे कार्य, 'कोयना धरण योजने'चा प्रथमपासून पाठपुरावा इत्यादींतून शंकररावांनी केलेले कार्य महाराष्ट्राच्या औद्योगिकीकरणास चालना देणारे ठरले. दक्षिण महाराष्ट्रातील साहित्य, रंगभूमी, शिक्षण यांसारख्या सांस्कृतिक क्षेत्रांमध्ये त्यांनी नेहमीच पुढाकार घेतला. ते स्वतः उत्कृष्ट चित्रकारही होते. अशा या चतुरस्त्र लेखकाचे १ जानेवारी १९७५ रोजी निधन झाले.

Nashik Edition
Oct 08, 2025 Page No. 4
Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401